सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राज्यातील आरोग्य संस्थांकरिता सर्पदंश विष द्रुत निदान साधनांची (Snake Venom Rapid Test Kit) एकलस्त्रोत पद्धतीने खरेदी करण्यास लेखाशीर्ष २२१०K०६१ अतंर्गत ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या उद्दिष्टांतर्गत रु.१,२२,८३,०००/- इतके अनुदान वितरीत करुन खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः निधीवि-४८२६/प्र.क्र.११५/खरेदी कक्ष
गोकुळादास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : २३ जुलै, २०२६

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि.०७.०४.२०२५

२) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष, मुंबई यांचे पत्र क्र.२३७९-८२/आसेआ/खरेदी कक्ष (१२)/सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव/२०२६, दि.१२.०५.२०२६

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.प्रशामा-१२२५/प्र.क्र.२३९/खरेदी कक्ष, दि.२९.०५.२०२६

४) उपसंचालक (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.२७०८-१०/आसेआ/खरेदी कक्ष/Snake Venom Rapid Test निधी/२०२६, दि.१८.०६.२०२६

प्रस्तावना:-

सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष, मुंबई यांनी वाचा मधील अ.क्र.२ येथील दि.१८.०६.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावानुसार सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राज्यातील आरोग्य संस्थांकरिता सर्पदंश विष द्रुत निदान साधनांची (Snake Venom Rapid Test Kit) एकलस्त्रोत पद्धतीने खरेदी करण्यास लेखाशीर्ष २२१०K०६१ अतंर्गत ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या उद्दिष्टांतर्गत एकूण रु.६,१४,४३,७४८/- इतक्या रक्कमेस वाचा क्र.३ येथील दि.२९.०५.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

२. उक्त प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने वाचा मधील अ.क्र.१ येथील दि.०७.०४.२०२५ रोजीच्या परिपत्रका अन्वये वित्त विभागाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राज्यातील आरोग्य संस्थांकरिता सर्पदंश विष द्रुत निदान साधनांची Snake Venom Rapid Test Kit ची एकलस्त्रोत पद्धतीने खरेदीकरीता २२१०K०६१ अतंर्गत ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या उद्दिष्टांतर्गत रुपये ६.१४४४ कोटी इतक्या प्रशासकीय मान्यता रक्कमेच्या २०% म्हणजेच रुपये १.२२८३ कोटी इतका निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरित करुन खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राज्यातील आरोग्य संस्थांकरिता सर्पदंश विष द्रुत निदान साधनांची (Snake Venom Rapid Test Kit) एकलस्त्रोत पद्धतीने खरेदीकरीता २२१०K०६१ अतंर्गत ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या उद्दिष्टांतर्गत रुपये १,२२,८३,०००/-(अक्षरी एक कोटी बावीस लक्ष त्र्याऐंशी हजार फक्त) इतका निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरीत करुन करुन वाचा क्र.२ येथील दिनांक २९.०५.२०२६ च्या शासन निर्णयात नमूद बाबींवर विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. प्रस्तुत सहायक अनुदानाची देयके कोषागारातून आहंरीत करण्यासाठी "प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय" यांना "आहंरण व संवितरण अधिकारी" व "सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई" यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर निधी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई यांना वर्ग करावयाचा असल्याने "मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई" यांना "अदाता" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आलेला निधी मंजूर बाबींवर खर्ची पडल्यानंतर सदरील खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र तात्काळ शासनास सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकिय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई यांची राहील.

६. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.२४.०२.२०२५ नुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या महाराष्ट्र वैद्यकिय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई या संस्थेचे "मुख्य लेखा व वित्त अधिकारी" यांना वित्त विभाग, शासन निर्णय दि.१४.०२.२०२४ मधील तरतुदीनुसार म.को.नि. नमुना क्र. ४४ देयकाद्वारे ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) अंतर्गत राज्याच्या एकत्रित निधीतून आहरित केल्या जाणा-या सहाय्यक अनुदानाच्या निधीचा विनियोग करण्यासाठी आभासी वैयक्तिक ठेव व लेखा प्रशासक (Virtual Personal Deposit Account Administrator) (VPDA) म्हणून घोषित करण्यात येत आहे.

७. लेखाशिर्ष २२१० के ०६१ अंतर्गत ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) हे लेखाशिर्ष महाराष्ट्र वैद्यकिय वस्तु खरेदी प्राधिकरण, मुंबई साठी नव्याने निर्माण करण्यात आलेले असल्याने सदर लेखाशिर्षा अंतर्गत गंभीर स्वरूपाचे लेखा आक्षेप नाहीत.

८. लेखाशिर्ष २२१० के ०६१ अंतर्गत ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) अंतर्गत कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाहीत.

९. सदर अनुदान "सशर्त" असून यापूर्वी शासनाकडून वितरीत केलेल्या अनुदानाचा विनियोग ज्या कारणासाठी निधी मंजूर केला होता त्याच प्रयोजनासाठी करण्यात येणार आहे. केलेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व योजनेच्या प्रगतीचा अहवाल राज्य शासनास विहित प्रपत्रात वेळोवेळी पाठविण्यात येईल. तसेच सदरील निधी हा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात खर्च करण्यात येईल. संबंधित योजनेसाठी प्राप्त झालेल्या अनुदानापेक्षा अधिक खर्च होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधीत कार्यालय प्रमुख यांची राहील.

१०. सदर खरेदीसाठी वितरीत करावयाच्या देयकांची द्विरूक्ती होणार नाही तसेच निधी विहित कार्यपद्धतीने खर्च करण्याची तसेच सदर निधी ज्या प्रयोजनासाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्याची संपूर्ण जाबाबदारी आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई व सहसंचालक, आरोग्य सेवा, खरेदी कक्ष, मुंबई यांची राहील.

११. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. २०१३/ प्र.क्र. ८५/ २०१३/ अर्थसंकल्प, दिनांक २५.०४.२०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

१२. सदर प्रस्तावामधील बाबी खरेदी करण्यासाठी शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, दि.०१.१२.२०१६ मधील तरतूदीनुसार आवश्यक तेथे प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

१३. या कामी होणारा खर्च, “मागणी क्र.आर-१, (०३) महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, (०३) (०१) महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत औषधे, औषधी साहित्य, यंत्रससामग्री व साधनसामग्री खरेदी (अनिवार्य), ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (२२१०K०६१)” या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात येऊन तो सदरहू लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

१४. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५२५/२०२६/व्यय-१३ ,दिनांक २०.०७.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

१५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२३१०१६५७३९१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHANDRAKANT HARIDAS WADE

Digitally signed by CHANDRAKANT HARIDAS WADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT,
2.5.4.20=fda96a8ca4dd3ecbdbbe4b156e5eaa93f60f3e037cbbbbdefe9e2961f45f0960, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9474E7143B2BC3FD96E8D7BF07D1CE51DE8461D4C34AE1E3F643C11B54523936, cn=CHANDRAKANT HARIDAS WADE
Date: 2026.07.23 11:42:16 +05'30'

(चंद्रकांत ह. वडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई.
३) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
४) सह संचालक, आरोग्य सेवा, (खरेदी कक्ष),आरोग्य सेवा संचालनालय मुंबई.
५) सहसंचालक, आरोग्य सेवा, (असंसर्गजन्य रोग),मुंबई
६) सह संचालक, आरोग्य सेवा, (अर्थ व प्रशासन),आरोग्य सेवा संचालनालय मुंबई.
७) सहसंचालक आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर),मुंबई.
८) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षण/लेखा अनुज्ञेयता),मुंबई /नागपूर.
९) उपसंचालक, आरोग्य सेवा, (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय मुंबई.
१०) वित्त विभाग (व्यय-१३/अर्थ-९), मंत्रालय, मुंबई.
११) सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प कार्यासन), मंत्रालय, मुंबई.
१२) अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
१३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
१४) निवडनस्ती (खरेदी कक्ष)